18 MAY 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एच इंडेक्समध्ये विद्यापीठ 'सेकंड'

## संशोधनाला दिलेल्या प्रोत्साहनाचे फलित, 'स्कोपस'च्या अहवालातील निष्कर्ष



**संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १७ : राज्यभरातील विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठ 'एच इंडेक्स'मध्ये द्वितीय ठरले आहे. प्राध्यापकांना संशोधनासाठी दिले जाणारे प्रोत्साहन व संशोधनाचे गुणवत्ता याच्या जोरावर विद्यापीठाने 'स्कोपस'च्या अहवालात ८८ एच इंडेक्स मिळवला आहे. मुंबई १०० एच इंडेक्ससह पहिल्या क्रमांकावर, तर पुणे ६९ एच इंडेक्ससह तृतीय क्रमांकावर आहे.

**नॅनो टेक्नॉलॉजी, बायोटेक्नॉलॉजीसारख्या प्रगत विषयांत प्राध्यापक संशोधनात गुंतले. प्राध्यापकांना संशोधन प्रकल्प, निधी मिळाला. शोधनिबंधांचे रूपांतर पब्लिकेशन्समध्ये झाले. भविष्यातही प्राध्यापक व विद्यार्थ्यांना संशोधनासाठी बळ देत राहू.**
**- डॉ. डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू
(शिवाजी विद्यापीठ)

एखाद्या प्राध्यापकाचा शोधनिबंध, त्याची गुणवत्ता व त्याचा संदर्भ म्हणून झालेला वापर याची गुणात्मक बेरीज होण्यासाठी जॉर्ज हिर्ष यांनी २००५ ला एच इंडेक्स प्रणाली शोधली. विद्यापीठातील प्राध्यापकांकडून होणाऱ्या संशोधनाची गुणवत्ता एच इंडेक्समधून व्यक्त होते. प्राध्यापकांनी प्रसिद्ध केलेले पब्लिकेशन्स व त्याचा संदर्भ म्हणून झालेला वापर, याच्या संख्यांचा सुवर्णमध्य साधून एच इंडेक्स निश्चित केला जातो.

**शिवाजी विद्यापीठाचे वर्षनिहाय पब्लिकेशन्स**

| | |
|---|---|
| २००८ | १८३ |
| २००९ | २३६ |
| २०१० | २५३ |
| २०११ | ३२८ |
| २०१२ | ३०७ |
| २०१३ | ३२४ |
| २०१४ | ३११ |
| २०१५ | ३३७ |
| २०१६ | ३५१ |
| २०१७ | ३४४ |
| २०१८ | १२२ |

| विद्यापीठ | एच इंडेक्स | सायटेशन |
|---|---|---|
| मुंबई | १०० | ८२४८५ |
| शिवाजी | ८८ | ६५७९२ |
| पुणे | ६९ | ४१०४६ |
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (नागपूर) | ५६ | २५९११ |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ (औरंगाबाद) | ५४ | २०९६९ |
| उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ (जळगाव) | ४८ | १६१२२ |
| संत गाडगेबाबा (अमरावती) | ४२ | १२३७० |
| स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा (नांदेड) | ३८ | ९८९७ |
| सोलापूर | ३३ | ४८९० |
| एसएनडीटी | २७ | ५२६४ |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजी | २० | २१०५ |

18 MAY 2018 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दहा हजार उमेदवारांची नोंदणी


## विद्यापीठात उद्या 'कौशल्य' महामेळावा : ११० कंपन्यांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात कौशल्य व रोजगार महामेळावा शनिवारी (दि. १९) सकाळी दहा ते सायंकाळी पाच यावेळेत होणार आहे. त्यासाठी ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने दहा हजार उमेदवारांनी गुरुवारपर्यंत नोंदणी केली आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी दिली.

विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि मध्यवर्ती रोजगार कक्षातर्फे हा महामेळावा होणार आहे. या मेळाव्यांतर्गत विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी व विविध कौशल्ये उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

विद्यापीठातील नऊ अधिविभागांच्या इमारतींमध्ये या कंपन्यांच्या मुलाखती आणि कौशल्य प्रदान स्टॉल व स्पॉट नोंदणी लोककला केंद्रात होणार आहे. मेळाव्यासाठी ११०हून अधिक कंपन्यांनी सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या माध्यमातून ८५०० रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत. विविध समितींच्या माध्यमातून तयारी सुरू असून ती अंतिम टप्प्यात आहे. शिक्षक, प्रशासकीय सेवक यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक असे दोनशेजण स्वयंसेवक म्हणून कार्यरत असणार आहेत, अशी माहिती समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी दिली.



### उमेदवारांसाठी हे महत्त्वाचे

या मेळाव्यासाठी येताना उमेदवारांनी बायोडाटाच्या किमान तीन प्रती, स्वत:चा पासपोर्ट आकाराची छायाचित्रे आणि पाण्याची बाटली आणावी..

" या मेळाव्यास किमान १५ हजार उमेदवार उपस्थित राहतील, अशी शक्यता गृहित धरुन विद्यापीठ प्रशासनाने आवश्यक ते नियोजन केले आहे. योग्य त्या कागदपत्रांसह उपस्थित राहून उमेदवारांनी संयम, शिस्त, स्वच्छता बाळगावी.

\- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु

### या अधिविभागात होणार मुलाखती



- रसायनशास्त्र अधिविभाग (आय.टी. व बी.पी.ओ. कंपनी)
- वनस्पतीशास्त्र (सेवा क्षेत्र, एच.आर., डी.टी.पी.)
- इलेक्ट्रॉनिक्स (बँकिंग, विमा व वित्तीय संस्था)
- वि. स. खांडेकर भाषा भवन (इतर क्षेत्रे)
- भौतिकशास्त्र (विविध चार कंपन्या)
- गणित (विक्री, वस्त्रोद्योग, टेलिकॉम)
- मानव्यशास्त्र इमारत (विपणन, बँकिंग, फायनान्स)
- तंत्रज्ञान (अभियांत्रिकी, कारागीर, तंत्रज्ञ, सीएनसी, व्हीएनसी)
- भूगोल (इतर क्षेत्रे)

18 MAY 2018 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोजगार महामेळाव्यात दहा हजार उमेदवारांची नोंदणी

## साडेआठ हजार रोजगार, ११० कंपन्यांचा सहभाग

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठात शनिवार, १९ मे रोजी होणाऱ्या कौशल्य व रोजगार महामेळाव्यासाठी दहा हजार उमेदवारांनी नोंदणी केली असून, ११० कंपन्यांच्या माध्यमातून साडेआठ हजार रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. मेळाव्यांतर्गत तीसहून अधिक क्षेत्रांशी निगडित ५० हून अधिक कौशल्यांचे प्रदानही युवकांना करण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी गुरुवारी दिली.

**अधिविभागांची नावे, कंसात कंपन्यांचे क्षेत्र व त्यांच्याकडून उपलब्ध असलेल्या रोजगार संधी या क्रमाने पुढीलप्रमाणे :**

१) रसायनशास्त्र अधिविभाग (आयटी व बीपीओ क्षेत्रातील १४ कंपन्या, रोजगार १२८३). २) वनस्पतीशास्त्र अधिविभाग (सेवा क्षेत्र, एचआर, डीटीपी ६ कंपन्या, रोजगार १६०) ३) इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग (बँकिंग, विमा व वित्तीय संस्था- ४, रोजगार ४८) ४) वि. स. खांडेकर भाषा भवन (इतर क्षेत्रे- ६ कंपन्या, ७० रोजगार) ५) भौतिकशास्त्र अधिविभाग (विविध ४ कंपन्या, रोजगार १६२) ६) गणित अधिविभाग (विक्री, वस्त्रोद्योग, टेलिकॉम- २१ कंपन्या, रोजगार १२१०) ७) मानव्यशास्त्र इमारत (विपणन, बँकिंग, फायनान्स- १४ कंपन्या, रोजगार ३५३९) ८) तंत्रज्ञान अधिविभाग (अभियांत्रिकी, कारागीर, तंत्रज्ञ, सीएनसी, व्हीएनसी- ४० कंपन्या, १७६४ रोजगार) ९) भूगोल अधिविभाग (इतर क्षेत्रे- ५ कंपन्या, रोजगार १००)

### उमेदवारांनी शिस्त पाळावी

या मेळाव्यास किमान १५ हजार उमेदवार उपस्थित राहतील, अशी शक्यता गृहीत धरून विद्यापीठ प्रशासनाने आवश्यक ते नियोजन करण्याची दक्षता घेतली आहे. तरीही या मेळाव्यास योग्य त्या कागदपत्रांसह उपस्थित राहून उमेदवारांनी विद्यापीठ परिसरात संयम, शिस्त व स्वच्छता बाळगून विद्यापीठ प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले आहे.

डॉ. गुरव यांनी दिलेल्या माहितीनुसार, मेळाव्यांतर्गत विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधी व विविध कौशल्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. विद्यापीठातील नऊ अधिविभागांच्या इमारतींमध्ये या कंपन्यांच्या मुलाखतींचे आयोजन केले जाणार आहे. कौशल्य प्रदान स्टॉल व स्पॉट नोंदणी लोककला केंद्रात केली जाणार आहे. महामेळाव्याच्या आयोजनाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, मेळावा सुरळीतपणे पार पडण्यासाठी अधिविभागनिहाय समित्यांकडे जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. शिक्षक, प्रशासकीय सेवक यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक अशी सुमारे २०० स्वयंसेवकांची टीम या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी कार्यरत ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. उमेदवारांना विद्यापीठात येणे सोयीचे व्हावे, यासाठी केएमटी प्रशासनास जादा बस सोडण्यास सांगितले आहे. पोलीस बंदोबस्तही तैनात ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनासही विनंती करण्यात आली आहे. उमेदवारांना बायोडाटाच्या तीन प्रती, पासपोर्ट, पाण्याच्या बाटल्या आणाव्यात, अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 MAY 2018
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या रोजगार मेळावा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, केंद्रीय रोजगार कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने १९ रोजी कौशल्य व रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. हा मेळावा लोककला केंद्रात होणार असून, यात ५० हून अधिक कंपन्या सहभागी होणार आहेत. किमान २ हजार विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळेल. १० हजारांची नोंदणी झाली आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा या तिन्ही जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळावी म्हणून कौशल्य व रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळाव्यात उद्योजक, सॉफ्ट स्किल आदी कौशल्य संबंधित विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कृषी अभियांत्रिकी, आय. टी., बी. पी. ओ., सेवा क्षेत्र, प्रशासन, विमा व बँकिंग आदी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळेल. विविध कंपन्यांच्या ५० स्टॉलवर १०० हून अधिक क्षेत्रातील कौशल्यविकास प्रशिक्षण मिळणार आहे. मेळाव्यात नोकरीची संधी मिळणार तसेच कौशल्य विकास प्रशिक्षणही दिले जाणार आहे. विद्यापीठातील लोककला केंद्रात युद्ध पातळीवर तयारी सुरू आहे. विद्यार्थ्यांना कौशल्य विकास विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी ६० तज्ज्ञांची नियुक्ती केली आहे. संवाद कौशल्य, सॉफ्ट व हार्ड स्किल, जीवन कौशल्य आदी विषयावर माहिती दिली जाणार आहे. या मेळाव्याचे नियोजन प्रा. ए. एम. गुरव, डॉ. जी. एस. राशीनकर यांनी केले आहे.

**२ हजार विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होणार**

18 MAY 2018 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# बांधावरून थेट विद्यापीठातील बेंचवर !

## रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची शेतकऱ्यांनी दिली परीक्षा; विद्यापीठ वर्तुळात औत्सुक्य

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

ऊन, वाऱ्याची तमा न बाळगता शेतात राबणारा जगाचा पोशिंदा असणारा बळिराजा स्वत:च शेतीतील तज्ज्ञ असतो. हवामानाचा अंदाज घेत शेती करतो. आपलं शेत हिच त्याची शाळा असते. मात्र, बदलत्या जगात शेतकरीही स्वत:ला जुळवून घेत शेतीविषयक नवनवीन संकल्पना, गोष्टी शिकू लागला आहे. त्याचे प्रत्यंतर बुधवारी शिवाजी विद्यापीठातही आले. शेतातील बांधावर राबणाऱ्या बळिराजाने थेट विद्यापीठातील बेंचवर बसून रेशीमशास्त्राचा पेपर दिला. मोठ्या आत्मविश्वासाने २३ शेतकऱ्यांनी दिलेला पेपर विद्यापीठ वर्तुळात मोठ्या औत्सुक्याचा आणि चर्चेचा विषय ठरला.

शिवाजी विद्यापीठातील प्राणिशास्त्र अधिविभागात रेशीम उद्योग करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी 'रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रम' (मराठी माध्यम) सुरू करण्यात आला आहे. भारतात अशा पद्धतीने अभ्यासक्रम आखून शेतकऱ्यांना थेट आपल्या



कोल्हापूर : रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षेला जाण्यापूर्वी नोटसूवर शेवटची नजर टाकताना शेतकरी.



कॅम्पसमध्ये आमंत्रित करणारे शिवाजी विद्यापीठ हे देशातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. या अभ्यासक्रमांतर्गत रेशीम उद्योग करणाऱ्या बांधावरील शेतकऱ्यांनी बुधवारी विद्यापीठातील बेंचवर बसून सलग तीन तास रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रमाचा पेपर सोडवला. दुपारी ३ वाजता 'रेशीम कीटक संगोपन, रेशीम शेती व्यवसायातील आरोग्यविषयक समस्या आणि व्यवस्थापन' या विषयाचा पेपर सुरू झाला. या पेपरला जाताना परीक्षार्थी शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि कुतूहलही चर्चेचा विषय ठरले.

पान ४ पहा

### शेतात काम केलेला अनुभव पेपरसाठी उपयोगी

दररोज शेतीत काम करत असल्याचा अनुभव परीक्षेवेळी उपयोगी पडला. रेशीम उद्योगातील ज्या गोष्टी माहीत नाहीत, त्या गोष्टी शिकायला मिळाल्या. रेशीम कीटकांच्या जाती, त्यातील रोग, तुती लागवड आणि कीटक संगोपनाचे ज्ञान मिळाले. या परीक्षेमुळे पदवी प्रमाणपत्राबरोबर प्रत्यक्षात रेशीम उद्योगातून उत्पन्न वाढीसाठी लाभ होईल.

– वर्षा पाडळे (बाचणी, कागल)

### रेशीम उद्योगातून शेतकऱ्याला आर्थिक लाभ

पुरेसे मनुष्यबळ नसताना रेशीम व्यवसाय करता येतो. या व्यवसायामुळे शेतकऱ्याला प्रतिष्ठा प्राप्त होतेच; पण त्यांचे राहणीमान व जीवनमान उंचावण्यास मदत होते. दैनंदिन शेतीतील काम करताना मिळालेल्या अनुभवाचा लाभ आज विद्यापीठात पेपर सोडवताना झाला.

– आशा देशमुख (विटा, जि. सांगली)

### पेपर सोडवणे अवघड नाही

दहा–बारा वर्षांचा रेशीम उद्योगाचा अनुभव असल्याने पेपर सोडवणे कठीण गेले नाही. पेपरमधील प्रश्नही दैनंदिन कामातील होते. मात्र, पेपर वेळेत सोडवून पूर्ण करणे कठीण गेले. 'रेशीम अंडीपुंज निर्मिती, धागा निर्मिती, अर्थशास्त्र आणि रेशीम शेतीतील मूल्यवर्धन' हे काम शासकीय पातळीवरील असल्याने या विषयाचा पेपर अवघड जाईल. या परीक्षेला २३ शेतकरी बसले आहेत, पेपर सुरू होण्यापूर्वी आम्ही सर्व शेतकरी एकत्र येऊन चर्चा करून अभ्यास करतो. त्यामुळे सर्वच शेतकरी उत्तीर्ण होतील, असा अंदाज आहे.

– अप्पासाहेब झुंजार (यळगूड, ता. हातकणंगले)

# बांधावरून थेट विद्यापीठातील बेंचवर !

पान १ वरुन

तीन तास कधी संपले ते कळलेच नाही. रेशीम उद्योगाची आवड असल्याने दिवसभर शेतात फिरणाऱ्या शेतकऱ्यांना पेपर सोडविताना तीन तासांचा वेळ कधी संपला हेच कळत नाही. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर माहीत असल्याने कोणता प्रश्न अगोदर सोडवायचा, अशी संभ्रमावस्था निर्माण झाल्याचे काही परीक्षार्थी शेतकऱ्यांनी सांगितले. पेपर लिहिताना तीन तासांचा कालावधी कमी पडल्याची माहितीही त्यांनी दिली.

**असा आहे.... रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रम (मराठी माध्यम)**

- खाद्य वनस्पती लागवड आणि व्यवस्थापन (पेपर क्रमांक १)
- रेशीम कीटक संगोपन, रेशीम शेती व्यवसायातील आरोग्यविषयक समस्या आणि व्यवस्थापन (पेपर क्रमांक २)
- रेशीम अंडीपुंज निर्मिती, धागा निर्मिती, अर्थशास्त्र आणि रेशीम शेतीतील मूल्यवर्धन (पेपर क्रमांक ३)
- रेशीम कीटक, खाद्य वनस्पती, कीड व रोग व्यवस्थापन (पेपर क्रमांक ४)
- प्रत्येक पेपरला ७५ गुण असून कीटक संगोपन प्रात्यक्षिकासाठी ५० गुण आहेत. (प्रात्यक्षिक परीक्षा)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 MAY 2018
लोकमत

## अनिल काकोडकर यांचे रविवारी व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांचे व्याख्यान रविवारी (दि. २०) सायंकाळी पाच वाजता राजर्षी शाहू स्मारक भवनमध्ये होणार आहे. पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमाले'अंतर्गत हे व्याख्यान होणार आहे. डॉ. काकोडकर यांच्या व्याख्यानाचा विषय 'शाश्वत ऊर्जा सुरक्षा, आव्हाने व पर्याय' असा आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, तर प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के प्रमुख उपस्थित असणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 MAY 2018
लोकमत

# विद्यापीठात गारांचा खच



कोल्हापुरात गुरुवारी सायंकाळी गारांसह जोरदार वळीव बरसला. यावेळी शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहाबाहेरील हिरव्यागार लॉनवर गारांचा सडा पडला होता.